# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

**1. District (जिल्हा):** जळगाव **P.S.(ठाणे):** रामानंद **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0158 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 07/06/2022 16:24 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

**1. Day(दिवस):** रविवार

**Time Period (कालावधी):** पहर 5

**Date From (दिनांक पासून):** 08/05/2022

**Date To ( दिनांक पर्यंत):** 08/05/2022

**Time From (वेळेपासून):** 13:22 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:43 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 07/06/2022 **Time (वेळ):** 16:15 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 030 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 07/06/2022 16:13 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 2 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** MJ कॉलेज रोड वरिल तालुका उप,जळगाव

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** दिपक सुरेशकुमार कुकरेजा

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1982 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

**(h) Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मतानी गल्ली,सिंधी कॉलनी,जळगाव,रामानंद,जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मतानी गल्ली,सिंधी कॉलनी,जळगाव,रामानंद,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9226000088

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विजय सुरेशचंद्र गोसावी | | | 1. प्लॉट न16 आशाबाबा नगर ,,जळगाव, रामानंद,जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | चेतन सुधाकर राणे | | | 1. श्रीकष्ण कॉलनी,गणेश कॉलनी,प्लॉट न14/1 गट न43,जळगाव,रामानंद, जळगाव,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

1)रामानंद नगर पोस्टे जळगाव भाग- 6 CCTNS गु.रजि.नं. /2022भ्रष्टार प्रतिबंधक अधिनियम सन 1988 चे कलम 7 प्रमाणे2)मुळ तक्रारदार/फिर्यादी-दिपक सुरेशकुमार कुकरेजा वय.40 वर्ष धंदा.व्यापार रा. मतानी गल्ली,सिंधी कॉलनी.जळगाव3)आरोपीचे नाव व पत्ता -1) विजय सुरेशचंद्र गोसावी वय.54वर्ष धंदा.नोकरी सहकार अधिकारी-2(वर्ग -2)तालुका उपनिबधक सहकारी संस्था कार्यालय जळगाव रा.प्लॉट न.16 आशाबाबा नगर ,जळगाव (खाते सहकार विभाग वर्ग-3) 2)चेतन सुधाकर राणे वय48 व्यवसाय-नोकरी सहा.सहकार अधिकारी सहकारी सस्था कार्यालय रावेर प्रतिनियुक्ती तालुका उपनिबधक सहकारी संस्था कार्यालय जळगाव रा.प्लॉट न.14/1 गट न.43 श्रीकृष्ण कॉलनी,गणेश कॉलनी जवळ,जळगाव ( खाते सहकार विभाग वर्ग-3)4) गुन्हा.घ.त.वेळ व ठिकाण-दि.08/05/2022 रोजी 13.22 ते13.43 वाजे दरम्यान जळगाव शहरातील M.J कॉलेज रोड वरिल तालुका उपनिबधक सहकारी संस्था कार्यालय जळगाव येथे.5)गुन्हा दाखल ता. वेळ:-दि. 07/06/2022 रोजी 6)आरोपी अटक तारीख.वेळ. -दि. 07/06/2022 रोजी 7)लाचेची मागणी रक्कम 5,000/-रू.8)स्विकारली रक्कम-निरंक9)सापळा व तपास अधिकारी.श्री.एस.के. बच्छाव पोलिस निरिक्षक अँन्टी करप्शन ब्युरो जळगाव.खुलासा :-यातील मुळ फिर्यादी यांनी सन 2013 मध्ये रूक्मिनी अर्बन को ऑप ./ क्रिटीडीट सोसायटी ली.जळगाव यांच्या मार्फतीने लिलावामध्ये जळगाव शहरातील सिंधी कॉलनी मधील सर्वे न.510.प्लॉट न.288 हे घर विकत घेतले होते सदर घरात दुसरे कुंटुब राहत असल्याने सोसायटीने न्यायालयात दावा दाखल केला होता परतु सदर घर फिर्यादी यांचे नावावर करून दिले होते फिर्यादी याना प्रत्यक्षात घराच्या ताबा दिला नव्हता त्यानंतर सोसायटीने पत्रव्यवहार करून सदर घराच्या ताबा फिर्यादी यांच्या कडे दिला त्यानंतर सदर घराची शासकीय अधीकृत ताबा पावती फिर्यादीला मिळाली नाही त्याबाबत माहीती घेतली असता सदर ताबा पावती तालुका उपनिबधक सहकारी संस्था कार्यालय जळगाव येथुन मिळणार असल्याचे समजले त्यामुळे फिर्यादी यांनी दि.11/05/2022 रोजी तालुका उपनिबधक सहकारी संस्था कार्यालय जळगाव येथे जाऊन संबधीत लिपीक गोसावी व लिपीक चेतन राणे यांची भेट घेऊन घराचे ताबा पावती मागणी केली असता लिपीर गोसावी व लिपीक चेतन राणे यानी सदर ताबा पावती देण्याचा मोबदल्यात फिर्यादी यांचे कडेस 5000/-रुपयाची लाचेची मागणी केली होती म्हणुन फिर्यादी यानी दि-18/5/2022 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो जळगाव. कार्यालात तक्रार दिली होती .सदर तक्रारी ची 18/5/2022 रोजी ला.प्र.वी . जळगाव पथकाने पंचसाक्षीदार समक्ष पडताळणी केली असता यातील आरोपी क्र-1 व 2 यांनी फिर्यादी यांचे जळगाव शहरातील सिंधी कॉलनी मधील सर्वे नं-510प्लॉट नं- 288या मालमत्तेची शासकीय अधीकृत ताबा पावती देण्याचा मोबदल्यात 5000/- रुपये ची लाचेची मागणी करुन सदर लाच रक्कम मिळवण्याचा प्रयत्न

केला म्हणुन गुन्हा सोबत संगणीकृत केलेली फिर्याद या सोबत जोडली आहे.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** SANJAY BHIMDAS SAPKALE
**Rank (पद):** HC (Head Constable)
**No.(क्र.):** PCMH83933 **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**
**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15.Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची**

**Name (नाव):** vijay fakirrao shinde
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** POBN73044

फिर्याद रामानंद नगर पोलीस स्टेशन जळगांव
दि.०७.०६.२०२१.

**मी दिपक सुरेशकुमार कुकरेजा,वय ४० वर्षे,व्यवसाय व्यापार रा.मतानी गल्ली, सिंधी कॉलनी, जळगांव जि.जळगांव**

समक्ष हजर राहुन फिर्याद लिहुन देतो की, मी दि.१८.०५.२०२२ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, कार्यालय जळगांव येथे हजर राहुन पोलीस निरीक्षक श्री.एस.के.बच्छाव यांचेकडेस तालुका उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालय, जळगाव येथील लिपीक गोसावी व लिपीक चेतन राणे यांचे विरुध्द लाचेसंबधी तक्रार दिली होती ती खालील प्रमाणे

मी सन २०१३ मध्ये मी रूक्मिणी अर्बन को ऑप. क्रेडीट सोसायटी लि.जळगांव याच्या मार्फतीने लिलाव अंतर्गत सिंधी कॉलनी,जळगांव येथील विक्रीस असलेला सर्व्हे नं. ५१० मधिल प्लॉट नं.२८८ हे घर ९,५१,०००/–रु.विकत घेतले होते. परंतु तेथे पुर्वी पासुन कोणतेतरी हेमणानी नावाचे कुटुंब राहत होते. त्यावरून क्रेडीट सोसायटीने मा.जळगांव न्यायालयात दिवाणी दावा दाखल केला होता. सन २०१६ मध्ये क्रेडीट सोसायटीने सदर प्लॉटची खरेदी माझ्या नावावर करून दिली होती. परंतु प्रत्यक्षात मला ताबा मिळालेला नव्हता. म्हणुन मी देखिल दिवाणी कोर्टात चाललेल्या दाव्यामध्ये मी थर्ड पार्टी म्हणुन दिवाणी अर्ज सादर केला व तो मा. कोर्टाने दाखल करून घेतला होता.

त्यानंतर हेमणानी यांनी केलेला दिवाणी दावा सन २०१७ मध्ये मागे घेतला. परंतु ते घरामध्ये राहत होते. त्यामुळे मी सदर क्रेडीट सोसायटीला मला माझ्या मालमत्तेचा ताबा मिळणेबाबत सांगितले होते. मी पाठपुरावा केला असता क्रेडीट सोसायटीने सन २०२१ मध्ये मा.जिल्हाधिकारी सो,जळगांव या कार्यालयात वरील मालमत्तेचा ताबा मिळणेबाबत पत्रव्यवहार केला. त्यानंतर मा. जिल्हाधिकारी जळगांव या कार्यालयातुन वरील मालमत्तेचा ताबा देण्याबाबत क्रेडीट सोसायटीस यांना आदेशित केले व त्याबाबतची एक प्रत मला देण्यात आली.

संबधीत आदेश झाल्यानंतर हेमणानी कुटुंबाने मालमत्ता रिकामी करून दिली.परंतु सदर मालमत्तेची शासकीय अधिकृत ताबा पावती अद्यापपावेतो मिळालेली नाही. म्हणुन मी क्रेडीट सोसायटीत जावुन वसुली अधिकारी, विनोद दत्तात्रय सोनार यांना भेटलो असता त्यांनी ताबा पावती देण्याचे काम जिल्हा उप निबंधंक सहकारी संस्था, जळगांव यांचे कडे आहे तसे पत्र सदर कार्यालयात देण्यात आले आहे असे सांगितले.

त्यानंतर मी जिल्हा उपनिंबधंक सहकारी संस्था जळगांव येथे जावुन सदर पत्राबाबत माहीती घेतली असता सदर कार्यालयाकडुन मला तुमचे प्रकरण तालुका उपनिबंधक सहकारी संस्था, जळगांव या कार्यालयाकडे असल्याचे सांगुन त्यांच्याकडे जाण्यास सांगितले.

त्यानंतर मी तालुका उपनिबंधक सहकारी संस्था, जळगांव यांचे कार्यालयात गेलो असता माझे काम सदर कार्यालयातील संबंधीत लिपीक गोसावी व लिपीक चेतन राणे यांचे कडे असल्याने मी लिपीक गोसावी व लिपीक चेतन राणे यांना भेटलो असता त्यांनी मला सांगितले की,तुमची ताबा पावती ही रुक्मिणी अर्बन को.ऑप.सोसायटी,जळगांव यांचे नावे निघणार असुन तुम्ही सदर सोसायटीचे व्यवस्थापक विनोद सोनार यांना भेटा व त्यांच्याकडुन सदर मालमत्तेची ताबा पावती बनवुन आणा, आम्ही त्याची दप्तरी नोंद घेवुन त्यावर कार्यालयाचा शिक्का मारुन सही करून देतो असे सांगितले. त्यानंतर मी विनोद सोनार यांना भेटुन सदर ताबा पावती विचारपुस केली असता ते टाळाटाळ करीत होते. त्यावेळी त्यांनी मला सांगितले की,तुम्हाला जर खुप घाई असेल तर तुम्ही तालुका उपनिबंधक सहकारी संस्था, जळगांव येथे जावुन सदरची ताबा पावती घेवुन या असे सांगितले होते.

त्यामुळे मी दि.११.०५.२०२२ रोजी तालुका उपनिबंधक सहकारी संस्था,जळगांव यांचे कार्यालयात जावुन संबंधीत लिपीक गोसावी व लिपीक चेतन राणे यांना भेटुन माझ्या मालमत्तेची ताबा पावती बाबत विचारपुस केली असता त्यांनी मला सदर मालमत्तेची ताबा पावती क्रेडीट सोसायटीचे व्यवस्थापक यांच्याकडुन तयार करून घेवुन या त्यावर आम्ही आमच्या कार्यालयाचा शिक्का मारून सही करून देणार असल्याबाबत सांगुन त्यासाठी आम्हाला ५,०००/– रुपये आणुन द्यावे लागतील असे सांगितले. त्यावर मी त्यांना ५,०००/–रुपये शासकीय फि आहे का? असे विचारले असता त्यांनी अशी कोणतीही शासकिय पावती मिळणार नाही असे सांगितले. तसेच सदरचे ५,०००/–रु.आमच्याकडेस आणुन दया किंवा संबधीत क्रेडीट सोसायटीचे व्यवस्थापक विनोद सोनार यांचेकडेस देवुन द्या असे सांगितले. त्यानंतर आम्ही तुमच्या मालमत्तेच्या ताबा पावतीवर सही शिक्का मारुन देवु, त्यासाठी तुम्ही स्वतः किंवा संबंधीत क्रेडीट सोसायटीचे व्यवस्थापक विनोद सोनार हे आले तरी चालतील असे सांगितले.त्यावरून माझी खात्री झाली की,लिपीक गोसावी व लिपीक चेतन राणे हे मी खरेदी केलेल्या मालमत्तेची ताबा पावती तयार करून देण्याच्या मोबदल्यात माझ्याकडे ५,०००/– रुपये लाचेची मागणी करीत आहे असे माझे लक्षात आले. त्यासंदर्भात मी दि.१८.०५.२०२२ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, जळगांव समक्ष हजर राहुन तक्रार दिली होती.

त्यानंतर बच्छाव साहेब यांनी पुढील कार्यवाही जळगांव शहरातील सागर पार्क मैदानात जावुन करण्याचा निर्णय घेतला. त्याप्रमाणे मी,शासकीय पंच, बच्छाव साहेब व सापळा पथक असे जळगांव शहरातील सागर पार्क मैदानात गेलो. त्यानंतर बच्छाव साहेब यांच्या सुचनेवरुन पोकॉ प्रविण पाटील यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरी मधील मेमरीकार्ड मध्ये माझे व दोन्ही पंचाचे वक्तव्य घेतले.त्यानंतर बच्छाव साहेब यांनी मला व पंच क्र.०१ यांना थोडक्यात सुचना दिल्या.

त्यानंतर बच्छाव साहेब यांनी पोकॉ/प्रविण पाटील यांचेकरवी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन माझे बनियनच्या आत गळयात दोरीने लटकावुन दिले. त्यानंतर मला पंच क्रं.१ यांचेसह पंच क्र.०१ यांचे मोटर सायकलने लिपीक,गोसावी व लिपीक,चेतन राणे यांच्याशी लाचेची बोलणी करण्यासाठी तालुका उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालय,जळगांव दि.१८.०५.२०२२ रोजी १३.२२ वाजता रवाना केले.त्यावेळी सापळा पथक व पंच क्र.०२ असे जळगांव शहरातील सागर पार्क मैदानात थांबुन होते.

त्यानंतर १३.४३ वाजता मी व पंच क्रं. १ असे मोटार सायकलने जळगांव शहरातील सागर पार्क मैदानाजवळ परत गेलो. तेव्हा बच्छाव साहेब यांचे सुचनेवरुन पोकॉ प्रविण पाटील यांनी माझे कडील डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन ते बंद केले. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी पंच क्रं.१ यांना सापळा पथकापासुन रवाना केल्यानंतरची घडलेली हकीगत विचारली असता त्यांनी “मी व तक्रारदार असे सापळा पथकापासुन निघुन तालुका उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालय, जळगांव येथे गेलो. तेव्हा तक्रारदार यांनी कार्यालयातील एका इसमास राणे साहेब कुठे आहेत?असे विचारले. तेव्हा मी व तक्रारदार असे लिपीक गोसवी व लिपीक चेतन राणे बसले असलेल्या ठिकाणी गेलो. तेव्हा तक्रारदार यांनी नमस्ते गोसावी सर, असे सांगितले. तेव्हा बाजुला बसलेले चेतन राणे यांनी तक्रारदार यांना क्या बोल रहे दिपक भाई, असे विचारले. तेव्हा तक्रारदार यांनी चेतन राणे यांना क्या चेतन भाई, आप फोन नही उठा रहे है कबसे, तेव्हा चेतन राणे यांनी कब, बैठो अभी महिना हो गया, क्या यार पार्टी बिर्टी कुछ, असे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी मना थोडी है, अपने तरपसे कुछ भी, असे सांगितले. तेव्हा लिपीक गोसावी यांनी अस बसुन घे खुर्चीवर, असे सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी अपणा ताबा पावती का, असे विचारले असता लिपीक गोसावी यांनी तो आलाच नाही, इनसे पुछो, तुमसे झुट बोलके क्या फायदा है, असे सांगितले. तेव्हा चेतन राणे यांनी अबी क्या रहा तुम्हारा, ताबा पावती तो बॅक देंगी नां, मैने तुमको बोला की, तुमने उनके पास देके रखेल है, ओ आराच नही तो क्या करेंगे, बुलालो उसको, कोई प्राब्लम नही, कर देंगे ओ, असे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी क्या करना है, कैसे करना है, असे विचारले तेव्हा चेतन राणे यांनी क्या करना है, सही ही करनी है ना, तुमने तो दिया हैं ना उसको, कितने दिऐ है, तुमने उसको देके मोकला कर दो, असे सांगुन गोसावी यांना आवाज देवुन बापु हे... यांचे करून द्या, ताबा पावतीचं, असे सांगितले. तेव्हा लिपीक गोसावी यांनी करून देतो ना, तो आलाचं नही ना? असे सांगितले. त्यानंतर चेतन राणे यांनी त्यांचे उजव्या हाताचे पाच बोट दाखवुन तुमने बोला है ना, बस खतम करो, असे सांगितले. तेंव्हा लिपीक गोसावी यांनी देखील मानेने होकार देर्शविला. त्यानंतर तक्रारदार यांनी चेतन राणे व गोसावी यांना मै अर्धा एक तासमे आता, असे सांगितले. त्यावेळी लिपीक गोसावी यांनी तीन चार बजे लेके आओ, तेव्हा चेतन राणे यांनी दो मिनीटमे सही कर देंगे, छे बजे तक है हम, उसको भी साथमे लेक आओ, दो मिनीटमे सही करेंगे, तुम्हारे हाथ मे देंगे, असे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी लिपीक गोसावी व चेतन राणे यांना पाच हजार रूपये लेके आता मै, खतम करो विषय, असे सांगितले. तेव्हा चेतन राणे यांनी ओ कुछ प्रॉब्लम नही पैसो का? असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार व मी सदर ठिकाणाहुन सापळा पथकाजवळ परत आलो बाबत हकीगत कथन केली. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी मला घडलेली हकिगत विचारली असता मी देखील पंच क्रं.१ यांच्या सांगण्याप्रमाणे मिळती जुळती हकिगत सांगितली.

त्यानंतर बच्छाव साहेब व दोन्ही पंचानी डिजिटल व्हॉईस रेकॉर्डरमधील माझे लिपीक गोसावी व लिपीक चेतन राणे यांचेत झालेले संभाषण ऐकले. तेव्हा लिपीक गोसावी व लिपीक चेतन राणे यांनी माझे कडेस ५,०००/—रु.लाचेची मागणी केली असल्याची खात्री झाली. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी पुढील सापळा कार्यवाही सलगपणे एकत्रितरित्या करण्याचा निर्णय घेतला.

त्यानंतर बच्छाव साहेब यांनी सापळापुर्व कामी अँथ्रासिन पावडर नोटांना लावण्याचे प्रात्यक्षिक करण्याचे ठरविले.त्यानंतर मी माझे घर खर्चातुन हजर केलेली लाचेची रक्कम ५०००/—रु.त्यात ५००/—रु.दराच्या १० नोटांना अँथ्रासिन पावडर लावुन· सदर लाचेची रक्कम माझे पॅन्टच्या पुढील उजव्या बाजुच्या खिश्यात ठेवुन दिली होती.

त्यानंतर बच्छाव साहेब यांनी मला व पंच क्रं.१ यांना पुन्हा थोडक्यात सुचना दिल्या. त्यानंतर बच्छाव साहेब यांचे सुचनेनुसार पोकॉ/प्रविण पाटील यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन माझे शर्टच्या आतुन गळयात लटकवुन दिले. त्यानंतर मला पंच क्र.१ यांचेसह ५,०००/—रु.लाचेची रक्कम घेवुन लिपीक गोसावी व चेतन राणे यांना देण्यासाठी पंच क्रं.१ यांचे मोटार सायलकने १६.०२ वाजता रवाना केले हेते.

त्यानंतर १६.३५ वा. मी व पंच क्र.०१ असे कोणत्याही प्रकारचा इशारा न करता सदर कार्यालयाच्या बाहेर येवुन जळगांव शहरातील सागर पार्क मैदानात जावुन थांबलो.आमचे मागोमाग सापळा पथक देखील आले. तेव्हा बच्छाव साहेब यांनी माझे कडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन ते बंद केले व पंच क्रं.१ यांना सापळा पथकापासुन रवाना केल्या नंतरची घडलेली हकीकत विचारली असता त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे माझे जवळील मोटार सायकलने तालुका उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालय, जळगांव येथे गेलो. तेव्हा सदर कार्यालयात लिपीक गोसावी व चेतन राणे हे खुर्चीवर बसलेले दिसले. तेव्हा तकारदार यांनी लिपीक चेतन राणे यांना हो गया क्या, चेतन सर, नमस्कार गोसावी सर, हुआ नही, असे विचारले तेव्हा लिपीक गोसावी यांनी तो आला नही अजुन, डाक्युमेन्ट त्याच्याकडे आहेत, त्याला बोलावुन घ्या, असे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी विनोद नामक इसमास मोबाईल फोन लावुन डाक्युमेन्ट दिए नही क्या, डाक्युमेन्ट कहाँ पे है,साईन के लिए, असे विचारून फोन बंद केला. तेव्हा लिपीक चेनत राणे यांनी लेके आना बोलना,क्यु घुमा रहा हैं, असे सांगितले. तेव्हा लिपीक गोसावी यांनी तक्रारदार यांना त्याला पाठवुन द्या, असे सांगितले असता तक्रारदार यांनी दो मिनीट रूको,ओ आ रहा हैं,असे सांगुन तक्रारदार यांनी त्यांचे पॅन्टच्या पुढील उजव्या बाजुच्या खिश्यात ठेवलेली लाचेची रक्कम उजव्या हाताने बाहेर काढुन लिपीक गोसावी यांचे समोर धरली असता लिपीक गोसावी यांनी मानेने नकार देवुन आम्ही त्या गोष्टीला हे नाही भाऊ, आम्ही सहया करून देतो, काय आहे त्याच्यात, असे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी पुन्हा विनोद नामक इसमास मोबाईल फोनवरून फोन करून तुमने कुछ दिया क्या? कितने टाईममे आ रहे है, सुनो मेरी बात, मै दे डालता, तुम मेक्यु बादमे दे देना, कोई तकलीब नही, मै दे डालता, असे सांगुन फोन बंद केला. तेव्हा लिपीक गोसावी यांनी उसको भेज देना, शामको बी आया मै कर दुंगा सही... असे सांगितले तेव्हा तक्रारदार यांनी किरण आ रहा हैं, दस मिनीट मे, सही करके करलो तुम, मै देके चल जाता तुमको, ओ आयेंगे तो बादमे दे देना मेकु, दे दु.. असे सांगुन सदर लाचेची रक्कम लिपीक चेतन राणे यांना देवु केली असता लिपीक चेतन राणे यांनी अरे! नही नही, दिपक भाऊ, ये जादा हो गया क्या, अरे यार उसके लिए काम रूकाते क्या हम, असे सांगुन तक्रारदार यांच्या कडुन लाचेची रक्कम घेण्यास नकार दिला. तेव्हा तक्रारदार यांनी लिपीक चेतन राणे

यांना उसका नंबर लेता मै, निचे रूकता मै, असे सांगितले असता लिपीक राणे यांनी कोई प्रॉब्लम नही, असे सांगितले. त्यानंतर मी व तक्रारदार असे सदर कार्यालयाच्या खाली थांबलो.त्यानंतर काही वेळाने एक इसम मोटार सायकलने आम्ही उभ्या असलेल्या ठिकाणी आला. तेव्हा तक्रारदार यांनी सदर इसमास किरण सर क्या, असे विचारले तेव्हा सदर इसमाने तक्रारदार यांच्याकडे हाताने लिहीलेला एक कागद व त्याच्या चार छायांकीत प्रती दिल्या तेव्हा मी, तक्रारदार व किरण नामक इसम असे जिना चढुन कार्यालयाच्या आत गेलो. तेव्हा सदर कागदपत्रांवर लिपीक गोसावी यांनी शिक्के मारले, तेव्हा पुन्हा तक्रारदार यांनी त्यांचे जवळील लाचेची रक्कम लिपीक गोसावी यांचेसमोर धरून मै दे देता ना गोसावी सर, ये लेलो साईन करलो, मै बोलके गया जो बात की, पाच हजार लेलो खतम करो इसको, असे सांगितले असता तेव्हा लिपीक गोसावी यांनी तक्रारदार यांना ओ काम नही करते हम, नही ना भाई, कुछ नाराजी नही हैं, असे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी अबी तो बोला, उसके लिए मै दुकानपे पैसे लेने गया मै आपके लिए, दुकानपे गया पाच हजार रूपये लेके आया, असे सांगितले. तेव्हा लिपीक राणे यांनी कुछ बी नही, नही असे सांगुन सदर लाच रक्कम घेण्यास नकार दिला. तेव्हा तक्रारदार यांनी हो गया, चलो आऊ क्या मै, असे सांगुन मी व तक्रारदार असे परत आलो आहे बाबत हकीगत कथन केली.

त्यानंतर बच्छाव साहेब यांनी मला घडलेली हकीगत विचारली असता मी पंच क्र.०१ यांनी कथन केल्याप्रमाणे हकीगत सांगितली.तसेच त्यांनी माझेकडुन लाचेची रक्कम स्विकारली नाही. त्यांच्या देहबोली वरून त्यांना माझे विषयी संशय आलेला असावा तसेच लिपीक गोसावी व चेतन राणे यांनी मी खरेदी केलेल्या मालमत्तेवी ताबा पावती सही करून माझ्या ताब्यात दिली. त्यामुळे लिपीक गोसावी व चेतन राणे हे माझेकडून आता लाचेची रक्कम स्विकारतील असे वाटत नाही बाबत सांगितले. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी माझे ५०००/—रु. नोटा बदलवुन मला परत दिले. तसा पंचनामा केला आहे.

त्यानंतर मी दि.३१.०५.२०२२ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव कार्यालयात हजर राहुन लिपीक श्री.गोसावी व लिपीक श्री. चेतन राणे यांनी माझे जवळुन लाचेची रक्कम स्विकारली नाही. तसेच ते आता यापुढे माझेकडुन लाचेची रक्कम स्किारतील असे वाटत नाही. त्यांचे देहबोली वरुन त्यांना माझे विषय संशय आला असावा म्हणुन त्यांनी लाच रक्कम घेतली नाही. तरी त्यांचेवर पुढील योग्य ती कार्यवाही व्हावी बाबत जबाब दिला आहे.

त्या अनुषंगाने आज दि.०७.०६.२०२२ रोजी मला अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव कार्यालयात बोलाविण्यात आले. त्यानंतर मी, श्री.बच्छाव साहेब, दोन शासकीय पंच व सापळा पथक असे आम्ही तालुका उप निबंधक सहकारी संस्था कार्यालय, जळगांव येथे गेलो. तेव्हा मी सदर कार्यालयात लिपीक गोसावी व लिपीक चेतन राणे हे हजर असल्याचे बच्छाव साहेब यांना सांगितले. त्यावेळी बच्छाव साहेब यांनी लिपीक गोसावी व लिपीक चेतन राणे यांना त्यांची व सापळा पथकाची ओळख सांगुन लिपीक गोसावी व लिपीक चेतन राणे यांना ताब्यात घेतले. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी प्रथम लिपीक गोसावी यांना त्यांचे पुर्ण नाव, गांव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव विजय सुरेशचंद्र गोसावी, वय—५४, व्यवसाय नोकरी, सहकार अधिकारी—२ (व्दितीय श्रेणी), तालुका उप निबंधक सहकारी संस्था कार्यालय, जळगांव रा. प्लॉट नं.१६, आशा बाबा नगर ,जळगांव असे सांगितले.

त्यानंतर बच्छाव साहेब यांनी लिपीक चेतन राणे यांना त्यांचे पुर्ण नाव, गांव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव चेतन सुधाकर राणे, वय—४८, व्यवसाय नोकरी, सहा.सहकार अधिकारी, सहकारी संस्था कार्यालय रावेर, प्रतिनियुक्ती तालुका उप निबंधक सहकारी संस्था कार्यालय, जळगांव रा. प्लॉट नं.१४/१, गट नं.४३, श्रीकृष्ण कॉलनी, गणेश कॉलनी जवळ, जळगांव असे सांगितले.त्यानंतर बच्छाव साहेब यांनी विजय गोसावी व चेतन राणे यांना ताब्यात घेतले आहे.

तरी विजय सुरेशचंद्र गोसावी, सहकार अधिकारी व चेतन सुधाकर राणे, सहा.सहकार अधिकारी, दोन्ही नेमणुक तालुका उप निबंधक सहकारी संस्था कार्यालय, जळगांव यांनी दि.१८.०५.२०२२ रोजी १३.२२ ते १३.४३ वा.चे दरम्यान जळगांव शहरातील एम. जे.कॉलेज रोडवरील तालुका उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालय, जळगाव येथे पंच क्र.०१ यांचे समक्ष मी खरेदी केलेल्या जळगांव शहरातील सर्व्हे नं. ५१० मधिल प्लॉट नं. २८८, सिंधी कॉलनी या मालमत्तेची ताबा पावती देण्याच्या मोबदल्यात ५,०००/— रुपयांची लाचेची मागणी केली व सदर लाच रक्कम मिळविण्याचा प्रयत्न केला.

अशा प्रकारे विजय सुरेशचंद्र गोसावी, सहकार अधिकारी व चेतन सुधाकर राणे, सहा.सहकार अधिकारी यांनी आपले लोकसेवक पदाचा दुरुपयोग करुन भ्रष्ट व बेकायदेशीर मार्गाचा वापर करुन माझेकडेस ५०००/—रु. लाच रक्कम मागणी केली व सदर लाच रक्कम मिळविण्याचा प्रयत्न केला. म्हणुन माझी त्यांचे विरुध्द कायदेशिर फिर्याद आहे.

माझी वरील नमुद फिर्याद मी स्वतः वाचुन पाहीली सदरची फिर्याद मी सांगितल्याप्रमाणे संगणकावर टंकलीखीत केली असुन ती बरोबर व खरी आहे.

समक्ष
(एस. के. बच्छाव)
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव

फिर्याद देणा—याची सही
दि.०७.०६.२०२२